# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**4 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना** : गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

माणसाचे मन मोठे अजब आहे. त्याच्याजवळ जे असते त्यांत त्याचे मन तृप्त नसते आणि त्याच्याजवळ जे नसते त्यासाठी ते मन आसुसलेले असते. त्यापैकी एक गोष्ट म्हणजे, "पंख". लहानपणी मी पऱ्यांच्या खूप कथा ऐकल्या होत्या, वाचल्या होत्या, या कथांतील पऱ्यांना पंख असत आणि त्या हव्या तेथे उडून जात असत. माणसाला पंख असते तर माणूसही आपल्या मनाप्रमाणे स्वैर भराऱ्या मारु शकला असता.

इंग्लंडमध्ये विश्वचषक क्रिकेटचे सामने चालू होते, तेव्हा भारतातील प्रत्येक क्रिकेटशौकिनाला वाटले असेल, मला पंख असते तर, मी आज उडत उडत इंग्लंडमध्ये गेलो असतो आणि एखाद्या इमारतीवर बसून हे सामने पाहिले असते.

माणसाला पंख मिळाले तर त्याला वाहनांची गरज राहणार नाही. मग प्रिमियर पदमिनी, मारुती, सॅन्ट्रो, मर्सिडीज अशा मोटारगाड्यांची मिजास उतरेल. मोटारगाड्यांची तिकिटे खरेदी करण्यासाठी रांगा लावाव्या लागणार नाहीत. विमानांची महागडी तिकिटे खरेदी करावी लागणार नाहीत. आज जी वाहनांची गर्दी सर्वत्र होत आहे ती टळेल. मुंबई कलकत्त्यासारख्या दाट लोकवस्तीच्या शहरांतील लोक तर पंख मिळाल्यावर खूप आनंदित होतील. कारण त्यांना रोज कामावर जाण्यासाठी जो त्रास, जी दगदग सहन करावी लागते ती टळेल. आपल्या पंखांच्या मदतीने ते उडत उडत आपल्या कामाच्या जागेवर वेळेवर पोचतील. रस्त्यावरील वाहनांची गर्दी टळल्यामुळे हवेतील प्रदूषणाचा धोका टळेल. त्यायोगे पर्यावरणाचे संतुलन राहील. दुसराही एक मोठा फायदा होईल, तो म्हणजे, आपल्याला वाहनांसाठी इंधनाची गरज राहणार नाही.

---